www.rajdand.com
सातारा, बुधवार
25.01.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ शु. ४
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे



'रोमिओ ज्युलिएट'नी निर्मात्यावर ठोकला पन्नास कोटी डॉलर्सचा दावा
पान ४ वर..

# कोयता गँगच्या दहशतीनंतर साताऱ्यात गोळीबार

## वाढेफाटा येथे झालेल्या घटनेत शुक्रवार पेठेतील युवक ठार

**सातारा (प्रतिनिधी) : गेल्या चोवीस तासात सातारा शहरात दोन दहशतीच्या घटना घडल्याने शांतता प्रिय पेन्शनर सिटी हादरली आहे. कोयता गँगच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्यानंतर काही तासातच वाढे फाटा परिसरातील एका हॉटेलमध्ये मंगळवारी रात्री एक वाजता गोळीबार झाला. शुक्रवार पेठ येथील अमित भोसले हा युवक या हल्ल्यात ठार झाला यामुळे एकच खळबळ उडाली आहे. पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी या घटनांची गंभीर दखल घेतली असून तपास यंत्रणा ॲक्शन मोडवर आली आहे.**

सातारा शहरानजीक असलेल्या महामार्गावरील वाढे गावच्या हद्दीत एका हॉटेल परिसरात गोळीबार करत एकाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हत्या झालेल्या युवकाचे नाव अमित भोसले असल्याची माहिती असून युवकाच्या डोक्यात गोळी घालून हत्या करण्यात आली आहे. गोळीबारानंतर मारेकरी फरार झाले आहेत.

घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी, सातारा शहरातील महामार्गावर मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास गोळीबार करण्यात आला. गोळीबार झाल्याच्या थरारनंतर परिसरात खळबळ उडाली. वाढे फाट्यानजीक पुण्याच्या दिशेला जाणाऱ्या व येणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणावर हॉटेल व्यवसाय चालतो. याच परिसरात हा गोळीबार झाला आहे. गोळीबाराचे कारण अद्याप समोर आलेले नाही.



सातारा : वाढेफाटा येथील घटनास्थळाची पाहणी करताना पोलीस अधिकारी व कर्मचारी.

घटनेची माहिती मिळताच सातारा तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच घटनास्थळाचा पंचनामा केला आहे. या गोळीबारामुळे हॉटेल व्यावसायिकांच्यात भीतीचे वातावरण निर्माण आहे. सदरचा मृत्यू झालेला युवक सातारा शहरातील असून, त्याच्यावर सातारा जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात येत आहे. त्या ठिकाणी त्याच्या कुटुंबियांनी, मित्रांनी धाव घेतली आहे. सातारा पोलिस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# पोवई नाक्यावर कोयता नाचवत दहशत माजवल्या प्रकरणी पाचजण ताब्यात

**सातारा (प्रतिनिधी) :** रविवारी रात्री उशिरा पोवई नाक्यावर कोयता नाचवून दहशत माजवणाऱ्या पाच जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरा पर्यंत सुरू होती.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पोवई नाक्याजवळील सयाजीराव हायस्कूलसमोर काही युवक हातात कोयता घेऊन तो नाचवत असल्याची माहिती सातारा शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार सातारा शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोघांना तात्काळ ताब्यात घेतले तर पळून जाणाऱ्या इतर तिघांना पोलिसांनी मोठ्या शिताफीने पोवई नाक्यावर जेरबंद केले.

सातारा शहरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाचही जणांना पोलिसांनी पोलीस ठाण्यात नेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती पोलीस ठाण्यातून देण्यात आली.

गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित संशयित कोयता गॅंगमधील युवकांची नावे निष्पन्न होणार आहेत.

दरम्यान काही दिवसांपूर्वी पुण्यातील एका उपनगरामध्ये कोयता गँगमधील काही गुंडांनी धुमाकूळ घालून हातगाडीधारक तसेच दुकानांचे कोयता हातात घेत प्रचंड नुकसान करून दहशत माजवली होती; परंतु पुणे शहर पोलीस दलातील दोघा कर्मचाऱ्यांनी या दहशत वाजवणाऱ्या दोघांना पॉलिसी खाक्या दाखवून त्यांच्या मुस्क्या आवळल्या होत्या. या घटनेची चर्चा संपूर्ण राज्यभर झाली होती.

ही घटना ताजी असतानाच अशाच प्रकारचे लोन आता साताऱ्यात आल्याने साताऱ्यातही कोयता गँग सक्रिय झाली आहे की काय? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे; परंतु सातारा शहर पोलीसांनी आणि घटनेचे गांभीर्य ओळखून माहिती मिळताच काही मिनिटातच संशयित कोयता गँगमधील पाच जणांना तात्काळ ताब्यात घेत पुण्यातील थेरं साताऱ्यात चालणार नाहीत, असा इशारा या कारवाईच्या निमित्ताने दिला आहे.

या कारवाईमध्ये सातारा शहर पोलीस दलातील संतोष शेलार, अभिजीत यादव, विनायक मळवी व वाहतूक शाखेच्या विशाल मोरे यांनी धैर्य दाखवत संबंधितांना जेरबंद केल्याने त्यांचे पोलीस दलातून कौतुक होत आहे.

## धक्काबुक्की केल्याप्रकरणी परस्पर विरोधी तक्रारी दाखल

**सातारा :** सदरबझार येथील सुकांत अपार्टमेंट मध्ये राहत असलेल्या दोघांनी एकमेकांना धक्काबुक्की करून शिवीगाळ केल्याच्या परस्पर विरोधी तक्रारी शहर पोलीस ठाण्यात दाखल झाल्या आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अमित जाधव (वय ४५) व समीर इनामदार हे दोघेही सदरबझार येथील सुकांत अपार्टमेंट मध्ये राहत आहेत. त्यांच्या वाद होऊन दोघांनी एकमेकांना धक्काबुक्की केल्याच्या तक्रारीवरून सातारा शहर पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक चौधरी करत आहेत.

# मविआ सरकारच्या काळात तुरुंगात टाकण्याचा डाव

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा गौप्यस्फोट



**मुंबई :** महाविकास आघाडी सरकारच्या काळात खटले टाकण्याचं, फौजदारी गुन्हे दाखल करण्याचं ,आपल्याला जेलमध्ये टाकण्याचं टार्गेट ठेवण्यात आलं होतं. हे टार्गेट तत्कालीन पोलीस आयुक्त संजय पांडे यांना देण्यात आलं होतं. असा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. मात्र त्यांचे प्रयत्न असफल झाले नाहीत. कसेही करुन यांना अडकवा, जेलमध्ये टाका असे आदेश मविआ सरकारच्या वतीनं देण्यात आले होते. असंही फडणवीस म्हणालेत. पोलीस अधिकाऱ्यांना याची माहिती असल्याचंही त्यांनी सांगितलं.

पाच वर्ष ज्यांच्यासोबत काम केलं, त्या उद्धव ठाकरेंनी मातोश्रीचे दरवाजे बंद केले अशी खंत फडणवीस यांनी व्यक्त केली. ज्यांच्यासोबत काम केलं त्यांनी फोन घेणंही बंद केलं. असं ते म्हणाले. काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत जाण्याचा निर्णय घेतला त्यावेळी फोन करुन कर्टसी म्हणूनही उद्धव ठाकरेंनी कळवलं नाही, असंही फडणवीस म्हणाले. मात्र आजही उद्धव ठाकरे यांच्याबाबत कटुता नसल्याचं फडणवीसांनी स्पष्ट केलं आहे. आजही त्यांच्यासोबत बसून चहा पिऊ शकतो असंही फडणवीस म्हणालेत. तर नुकत्याच एका कार्यक्रमात रश्मी ठाकरे भेटल्या असल्याचं सांगत, त्यांना उद्धव ठाकरेंना नमस्कार सांगा, हा संदेश पाठवल्याचंही फडणवीस म्हणालेत.

राज्याच्या मंत्रिमंडलाचा विस्तार होण्याची गरज असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. लवकरच हा विस्तार होईल असे त्यांनी सांगितले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी हा विस्तार करण्याचा प्रयत्न असेल, असेही त्यांनी सांगितले.

## बेदरकारपणे वाहन चालवल्या प्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा :** बेदरकारपणे वाहन चालवल्या प्रकरणी दोघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आले आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २१ जानेवारी रोजी सहा वाजण्याच्या सुमारास अमित सुनील म्हेत्री वय २५, रा. संभाजीनगर, सातारा हा युवक सिटी पोस्ट ते हेम एजन्सी जाणाऱ्या रस्त्यावर आपल्या ताब्यातील मोटरसायकल लोकांच्या जीवितास धोका होईल व वित्तहानी होईल तसेच रहदारीस अडथळा होईल अशा रीतीने उभी केलेल्या स्थितीत आढळून आला. याप्रकरणी त्याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत उत्कर्ष मोहन पाटील वै २२ राहणार बोरकर तालुका सातारा हा त्याच्या ताब्यातील वाहन वेडेवाकडे, बेदरकारपणे, मानवी जीवितास धोका निर्माण होईल इतक्या भरधाव वेगाने चालवीत असलेला आढळून आला. या प्रकरणी त्याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# ठाकरे-आंबेडकरांच्या युतीने फरक पडत नाही

## रामदास आठवले : उद्धव यांची शक्ती कमी झाल्यानेच ते पर्याय शोधताहेत

**वाई (प्रतिनिधी) :** उद्धव ठाकरेशिवसेना आणि प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजनआघाडीच्या युतीमुळे राज्याच्या आणिमुंबईच्या राजकारणावर काहीही फरकपडणार नाही. कोणी कोणाबरोबर युती करावी, हा ज्याचा त्याचा अधिकार आहे. ते दोघे एकत्र आले म्हणजे शिवशक्ती आणि भीमशक्ती एकत्र आले असे म्हणता येत नाही, असेस्पष्टीकरण केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केले.

महाबळेश्वर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे पदाधिकारी व महत्त्वाच्या कार्यकर्त्यांचे एक दिवसीय अभ्यास शिबिर होत आहे. या शिबिरासाठी जात असताना वाई येथे जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड यांच्या कार्यालयात ते पत्रकारांशी बोलत होते.



वाई येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा सत्कार करताना अशोक गायकवाड व पदाधिकारी.

आठवले म्हणाले, की यापूर्वी २०१४च्या निवडणुकीमध्ये भीमशक्ती आणिशिवशक्ती महायुतीत भाजपसोबत एकत्रआलेले आहेत आणि त्या वेळी आम्हीभरपूर जागाही जिंकल्या आहेत. त्याचा

परिणाम यापूर्वी समोर दिसून आलाआहे. उद्धव ठाकरे यांची शक्ती कमीझाली आहे. त्यामुळे ते पर्याय शोधतआहेत आणि म्हणून त्यांनी वंचितशीयुती केली आहे; परंतु महाराष्ट्रामध्येशिवशक्ती आणि भीमशक्ती पूर्वीपासूनकार्यरत आहे. आंबेडकरी अनुयायांमध्ये भाजपच्या कट्टर हिंदुत्ववादी भूमिकेमुळेकोणतीही अस्वस्थता नाही.

अस्वस्थतेचा परिणाम आमच्या पक्षावरहोणार नाही. आमचा पक्ष ज्या बाजूलाअसेल त्या बाजूला सत्ता असते, हेअनेक वर्षांचे गणित आहे. यावेळी मुंबईमहापालिकेमध्ये भाजप, बाळासाहेबांची

शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफयाइंडिया यांची सत्ता येईल. पंतप्रधाननरेंद्र मोदी यांचे नेतृत्वाखाली देशखऱ्या अर्थाने विकासाकडे वाटचालकरत आहे. त्यामुळे आंबेडकरांचे अनुयायी त्यांच्या सोबत आहेत,असेही ते म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली सर्वजाती धर्मांना एकत्र घेऊन जाण्याचीभूमिका रिपब्लिकन पार्टीने व्यापक केलीआहे. त्यासाठी यापुढे कोणती भूमिकाअसायला हवी, यासाठी महाबळेश्वर येथे कार्यकर्ता व पदाधिकाऱ्यांचे शिविर होत असल्याचे त्यांनी सांगितले.

## शॉक लागून एकाचा मृत्यू

**सातारा :** दौलतनगर, ता. सातारा येथील ४५ वर्षीय नितीन कदम यांना शॉक लागला. त्यांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापुर्वीच त्यांचा मृत्यू झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सिताराम नवघणे यांच्या घराचे रंगकाम सुरू होते. यावेळी स्लॅप घासण्यासाठी सूरू असलेल्य ग्रॅन्डर ची वायर पायाखाली आल्याने नितीन कदम यांना शॉक लागला. त्यामुळे ते जागीच बेशुद्ध झाले. त्यांना तात्काळ रूग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. याबाबतची नोंद तालुका पोलीस ठाण्यात झाली असून अधिक तपास पोलीस हवालदार डोंबाळे करत आहेत.

# मोदी, शहा फोडाफोडीच्या राजकारणात मग्न

## काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचा आरोप

**पानिपत : वृत्तसंस्था**

नरेंद्र मोदी आणि अमित शहा जेव्हापासून पंतप्रधान आणि गृहमंत्री बनले आहेत तेव्हापासून त्यांचे लक्ष राज्यकारभार करण्यापेक्षा निवडणुकांकडे अधिक आहे. इतर पक्षात फोडाफोडी करण्यातच ते दोघे मश्गुल आहेत, असा आरोप काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे. मोदी, शहा यांच्या मुखात राम आणि बगलेत सुरी असल्याचा टोमणाही त्यांनी मारला.

शहा यांनी त्रिपुरामध्ये एका जाहीर सभेत जानेवारी महिन्यात अयोध्येतील राम मंदिराचे उदघाटन होणार असल्याचे सांगितले. त्यावर खरगे यांनी कठोर शब्दात टीका केली. देवावर सगळ्यांचीच श्रद्धा आहे. तुम्ही तर देवाचा राजकारणासाठी वापर करून घेता. सन २०२४ मध्ये निवडणूक होणार म्हणून जानेवारीत राम मंदिराचे उदघाटन करणार असल्याच्या घोषणा केल्या जात आहेत. मंदिरांच्या घोषणा करायला तुम्ही पुजारी आहात की साधुसंत आहात, असा सवालही खरगे यांनी केला.

देशातील नागरिकांचे संरक्षण करणे, त्यांचे पोट भरणे, शेतकऱ्यांना योग्य भाव देणे हे तुमचे सरकार म्हणून काम आहे. मात्र, तुम्ही फोडाफोडी करण्यात मग्न आहात, अशी टीका त्यांनी केली. भारतीय जनता पक्षाचे नेते सुरी घेऊन फिरत आहेत. समाजात फूट पाडण्याचे काम करत आहेत. जाती जातींमध्ये, धर्मा धर्मांमध्ये फूट पाडत आहेत. ते निवडणुकीपूर्वी मोठमोठ्या घोषणाला करतात आणि निवडणुकीनंतर त्या हवेत विरून जातात, अशा शब्दात खरगे यांनी मोदी, शहा यांचे वाभाडे काढले.

### तहसीलदारांचा सही व शिक्का मारून

# बनावट शिधापत्रिका बनविणारा पप्पू आवटे पोलिसांच्या ताब्यात

**दहिवडी (प्रतिनिधी) :** दहिवडी (ता. माण) येथील पप्पू बाळासाहेब आवटे यांनी तात्कालीन तहसीलदार बाई माने यांची बनावट सही व शिक्का मारून व केसरी शिधापत्रिका तयार करून दिल्याबद्दल पप्पू आवटे यांच्यावर दहिवडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

दहिवडी येथील किरण युवराज पवार, सायबु दिलीप चव्हाण, सुरेश जीवा चव्हाण, तिघेही राहणार दहिवडी तालुका माण जिल्हा सातारा यांचेकडून सूर्यकांत उर्फ पप्पू बाळासाहेब आवटे राहणार दहिवडी याने रक्कम रुपये ३३०० प्रत्येकी घेऊन केशरी शिधापत्रिका बनवून दिली. या केशरी शिधापत्रिकेवर तात्कालीन तहसीलदार बाई माने यांची बनावट सही करून तहसीलदार माण यांचा बनावट शिक्का मारून गैरप्रकार केल्याचे उघडकीस आल्यानंतर माण तहसील कार्यालयातील कर्मचारी नोकरी रोजगार हमी अव्वल कारकून व अतिरिक्त कार्यभार पुरवठा निरीक्षक तहसील माण श्री.राहुल जाधव यांनी सदर प्रकरणाची तक्रार दहिवडी पोलीस ठाण्यात दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

# सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी दोघांना तीन महिने सक्तमजुरी व दंड

**सातारा :** सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी दोघांना न्यायालयाने तीन महिने सक्तमजुरी आणि दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक २५ ऑगस्ट २००७ रोजी संध्याकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास अमोल गुलाब आवळे वय ३६, रा. वाठार, ता. कोरेगाव आणि आप्पासाहेब उर्फ विजय जगन्नाथ घोरपडे वय ४६, राहणार सोनके, ता. कोरेगाव हे साताराचे तत्कालीन नायब तहसीलदार प्रशांत सुरेश पिसाळ यांच्या कार्यालयामध्ये घुसले. त्यांनी पांडुरंग कृष्णा भोसले यांच्यावर दाखल असलेल्या चॅप्टर केस मध्ये भोसले यांना प्रशांत पिसाळ तीन हजार रुपये चा बाँड व एमआयडीसीतील कारखान्यासाठी एक वर्षाकरिता जामीन असा आदेश केल्याने आवळे आणि घोरपडे यांनी चिडून जाऊन नायब तहसीलदार कार्यालयात धूडगुस घालत कार्यालयाचे कामकाज बंद पाडले. तहसीलदार यांनी आरोपींना तिथून निघून जाण्याचा आदेश केला असताना तो आदेश न पाळता तहसीलदारांचा अवमान करून शिवीगाळ दमदाटी केली. या घटनेचे साक्षीदार रवींद्र सावंत यांनी स्वतःच्या मोबाईलवरून घटनेचे चित्रीकरण केले असता आवळे आणि घोरपडे यांनी रवींद्र सावंत यांनाही शिवीगाळ दमदाटी करून त्यांच्या हातातील मोबाईल हँडसेट काढून घेऊन फोडला. हा प्रकार सोडवण्यासाठी अन्य लोक पुढे आले असता त्यांनाही मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली. या प्रकाराबाबत प्रांताधिकारी संजय शिंदे हे आरोपींना समजावण्यास आले असता त्यांच्याशी उद्धट वर्तन करून त्यांनाही दमदाटी करण्यात आली. याबाबत आरोपींवर शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र मायणे यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

हा खटला तिसरे तदर्थ जिल्हा सत्र न्यायाधीश आर. के. राजेभोसले यांच्या कोर्टात चालला होता. सरकारतर्फे अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील म्हणून नितीन मुके आणि श्रीमती पुष्पा जाधव यांनी खटल्याचे कामकाज पाहिले. या खटल्यात एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. केवळ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, फिर्यादी व अन्य साक्षीदारांच्या साक्षीवरून तसेच सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायाधीशांनी अमोल आवळे आणि अप्पासाहेब उर्फ विजय घोरपडे यांना कलम ३५३ अन्वये तीन महिने सक्तमजुरी आणि प्रत्येकी एक हजार रुपये दंड, दंड न दिल्यास पंधरा दिवस साधी कैद तसेच अमोल आवळे यास कलम ३९२ अन्वये तीन महिने सप्तमजुरी व एक हजार रुपये दंड, दंड न दिल्यास पंधरा दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

या खटल्यात भैरवी अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अविनाश पवार व पोलिस अंमलदार अजित फरांदे यांनी कामकाज पाहिले.

## पवनचक्कीमधील तांब्याची तार आणि दोन मोटरची चोरी

**सातारा :** पवनचक्की मधील तांब्याची तार आणि दोन मोटरची चोरी केल्याप्रकरणी अज्ञातावर औंध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी, २१ जानेवारी रोजी रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान जायगाव, ता. खटाव गावच्या हद्दीतील गट नंबर ८६२/१ मध्ये असणाऱ्या पवनचक्की मधील २५० किलो वजनाची तांब्याची तार असलेली केबल व दोन मोटर असा १ लाख ९२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे.